• सातारा, बुधवार, २५ सप्टेंबर २०१९

सकाळ

सकाळ | सातारा
सातारा, बुधवार, २५ सप्टेंबर २०१९

TODAY

f SakalNews | @SakalMediaNews | www.esakal.com | Call Centre : 9225800800

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# युवा महोत्सवात मुधोजी कॉलेज प्रथम

**कोरेगाव, ता. २४ :** देऊर (ता. कोरेगाव) येथील प्रा. संभाजीराव कदम महाविद्यालयामध्ये झालेल्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये फलटणच्या मुधोजी महाविद्यालयाने एकांकिका, पथनाट्य, लोकसंगीत वाद्यवृंद व वादविवाद या चार कला प्रकारांत प्रथम क्रमांक, तर लोकनृत्यमध्ये द्वितीय क्रमांक मिळवत युवा महोत्सवावर छाप उमटवली.

कोरेगावच्या डी. पी. भोसले महाविद्यालयाने इंग्रजी वक्तृत्वमध्ये प्रथम, मराठी, हिंदी वक्तृत्व व पथनाट्यामध्ये द्वितीय, लोकनृत्यामध्ये तृतीय क्रमांक मिळवले. सातारा येथील यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सने लघुनाटिका, लोकनृत्यामध्ये प्रथम, मूकनाट्यामध्ये द्वितीय, पथनाट्यामध्ये तृतीय क्रमांक मिळवले.

**कला प्रकारनिहाय अनुक्रमे पहिल्या तीन विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे :**

एकांकिका - मुधोजी (फलटण), द्वितीय डी. जी. (सातारा), कला व वाणिज्य (नागठाणे); लघुनाटिका - 'वायसी' (सातारा), शासकीय अभियांत्रिकी (कऱ्हाड), एसजीएम (कऱ्हाड); मूकनाट्य - दहिवडी महाविद्यालय (दहिवडी), 'वायसी' (सातारा), एसजीएम (कऱ्हाड); पथनाट्य - मुधोजी (फलटण), डी. पी. भोसले (कोरेगाव), 'वायसी' (सातारा); लोककला - 'किसन वीर' (वाई), सरदार बाबासाहेब माने (रहिमतपूर), दहिवडी महाविद्यालय (दहिवडी); लोकनृत्य - 'वायसी' (सातारा), मुधोजी (फलटण), डी. पी. भोसले (कोरेगाव); लोकसंगीत वाद्यवृंद - मुधोजी (फलटण), श्रीमंत भैयासाहेब राजेमाने (म्हसवड), दहिवडी महाविद्यालय (दहिवडी); भारतीय समूह गीत - 'किसन वीर' (वाई), प्रा. संभाजीराव कदम (देऊर), एसजीएम (कऱ्हाड); वादविवाद- मुधोजी (फलटण), कला, वाणिज्य (नागठाणे), 'शंकरराव जगताप' (वाघोली); सुगम गायन - वेणूताई चव्हाण (कऱ्हाड), शासकीय अभियांत्रिकी (कऱ्हाड), 'किसन वीर' (वाई); मराठी वक्तृत्व - 'बाळासाहेब देसाई' (पाटण), डी. पी. भोसले (कोरेगाव), डी. जी. (सातारा); हिंदी वक्तृत्व - 'शंकरराव जगताप' (वाघोली), डी. पी. भोसले (कोरेगाव), कला, वाणिज्य (सातारा); इंग्रजी वक्तृत्व - डी. पी. भोसले (कोरेगाव), शासकीय अभियांत्रिकी (कऱ्हाड), डी. जी. (सातारा); नकला - 'इस्माईलसाहेब मुल्ला' (सातारा), एसजीएम (कऱ्हाड), 'किसन वीर' (वाई). सर्व विजेत्या संघांना येत्या २६ ते २८ तारखेदरम्यान फलटण येथील मुधोजी महाविद्यालयात होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये सहभागी होता येणार आहे.



**देऊर (ता. कोरेगाव) : 'करकट्टम' नृत्य सादर करताना फलटणच्या मुधोजी महाविद्यालयाचा संघ.**